# जागतिक रोजगार आणि सामाजिक दृष्टिकोन अहवाल (सप्टेंबर २०२४) – सारांश

पूजा ठाकूर

## १. परिचय :

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेतर्फे (आयएलओ) दरवर्षी जागतिक रोजगार आणि सामाजिक दृष्टिकोन अहवाल प्रकाशित केला जातो. जागतिक कामगार बाजारपेठांच्या स्थितीचे तपशीलवार विश्लेषण यात केले जाते. रोजगार निर्मिती, बेरोजगारी, कामगार शक्ती सहभाग दर आणि वाढती जागतिक रोजगार तफावत यांसारख्या मुद्द्यांवर अंतर्दृष्टी प्रदान करण्याचे काम हा अहवाल करतो. 'सर्वांसाठी उत्पादक रोजगार आणि समुचित काम' हे संयुक्त राष्ट्रांनी नमूद केलेल्या महत्त्वाच्या शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी एक आहे. सप्टेंबर २०२४ मध्ये प्रकाशित झालेले अहवालाचे अपडेट त्यांपैकी दोन मुख्य निर्देशकांवर लक्ष केंद्रित करते:

१) श्रम/कामगार उत्पन्नाचा वाटा आणि

२) रोजगार, शिक्षण किंवा प्रशिक्षणात नसलेल्या तरुणांचे प्रमाण.

अहवालात सादर केलेले निष्कर्ष असे दर्शवितात की कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रातील अलीकडच्या प्रगतीमुळे जागतिक श्रम/कामगार उत्पन्नाचा वाटा कमी होत आहे. त्याचप्रमाणे, रोजगार, शिक्षण किंवा प्रशिक्षणात नसलेल्या तरुणांचे प्रमाण कमी करण्यात मंद गतीने प्रगती होत आहे. याचा अर्थ असा की वाढत्या तरुण लोकसंख्येसाठी रोजगार आणि शिक्षणाच्या संधी पुरेशा वाढलेल्या नाहीत. येत्या काळात एआयमधील होणारी वाढ पाहता, असमानतेवर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य सार्वजनिक धोरणात्मक उपाययोजना करणे गरजेचे ठरेल असे हा अहवाल सुचवतो. या सर्व मुद्द्यांचा आढावा खाली प्रस्तुत केला आहे.

## २. श्रम/कामगार उत्पन्नाचा घटता वाटा :

एखाद्या अर्थव्यवस्थेत, रोजगारात असणाऱ्या कामगारांना एकूण उत्पन्नाच्या (जीडीपीच्या) प्रमाणात किती उत्पन्न मिळते याचे मापन करण्यासाठी कामगार उत्पन्न वाटा

हे माप सूचक मानले जाते. अर्थव्यवस्थेतील असमानतेचे द्योतक म्हणून हे माप प्रचलित आहे. सदर अहवालात २००४ ते २०२४ पर्यंतच्या जागतिक कामगार उत्पन्नाच्या वाट्याचे अंदाज (estimates) सादर केले आहेत. गेल्या दोन दशकांत, राष्ट्रीय उत्पन्नातील कामगार उत्पन्नाच्या वाट्यात लक्षणीय घट झाल्याचे हे अंदाज सांगतात. ही घट सरासरी १.६ टक्के इतकी आहे. २००८ ते २०१०च्या आर्थिक मंदीदरम्यान या दरात तात्पुरती वाढ झाली. मंदी दरम्यान कामगार उत्पन्नाच्या तुलनेत नफा आणि इतर प्रकारच्या भांडवली उत्पन्नात वेगाने घट झाल्यामुळे हे घडले असे आपण म्हणू शकतो.

आकडेवारीचा तपशील पाहता असेही दिसून येते की, कामगार उत्पन्नाच्या वाट्यात विशेषतः कोविड-१९ साथीच्या वर्षांमध्ये प्रामुख्याने घट झाली आहे. साल २०१९ मध्ये कामगार उत्पन्नाचा वाटा ५२.९ टक्के होता, जो २०२२ मध्ये ५२.३ टक्क्यांपर्यंत घसरला. म्हणजेच, जागतिक स्तरावर, २०१९ ते २०२२ दरम्यान, कामगार उत्पन्नाचा वाटा ०.६ टक्क्यांनी कमी झाला. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की, गेल्या दोन दशकांमध्ये झालेल्या एकूण घटीपैकी जवळजवळ ४० टक्के घट २०२०-२२ या तीन वर्षांत झाली. टक्केवारीच्या बाबतीत ही घट माफक दिसत असली तरी, त्याचा परिणाम मोठा आहे. कामगार उत्पन्नातील ही घट २०२४ मध्ये, साल २००४ च्या तुलनेत, २.४ दशलक्ष डॉलर्सची (स्थिर क्रयशक्ती तुल्यता) (constant PPP) कमतरता दर्शवते.

गेल्या ५ वर्षांतील प्रदेशनिहाय ट्रेंडवरून दिसून येते की, २०१९ ते २०२४ दरम्यान आफ्रिका, अमेरिका आणि अरब राष्ट्रांमध्ये कामगार उत्पन्नाच्या वाट्यात अनुक्रमे - १.२ टक्के, - १.२ टक्के आणि - ०.८ टक्के घट झाली. याच कालावधीत आशिया आणि पॅसिफिकमध्ये ०.२ टक्के तर युरोप आणि मध्य आशियामध्ये १.० टक्के घट झाली.

## २.१ कामगार उत्पन्नातील लिंगभेद :

कामगार उत्पन्नातील लिंगभाव असमानता ही जागतिक असमानतेतील एक महत्त्वाची बाब आहे. गेल्या काही दशकांमध्ये जरी ती काही प्रमाणात कमी झाली असली, तरीही कामगार उत्पन्नातील लिंगभाव तफावत लक्षणीय आहे. २००५ मध्ये, पुरुषांच्या तुलनेत महिला कामगारांच्या उत्पन्नाचे गुणोत्तर ४६.८ टक्के होते. याचा अर्थ असा की पुरुष कामगारांनी उत्पन्नात कमावलेल्या प्रत्येक डॉलरमागे महिलांना फक्त ४७ सेंट (शतांश) मिळत होते. २०२४ पर्यंत हे प्रमाण ५१.८ टक्के झाले. ही लिंगाधारित विषमता सर्व प्रदेशांमध्ये अस्तित्वात आहे. २०२४ मध्ये, आशिया आणि पॅसिफिक, युरोप आणि मध्य आशिया आणि अमेरिकेसाठी हे प्रमाण अनुक्रमे ४४.२ टक्के, ६१.९ टक्के आणि ६४.७ टक्के होते. अरब राज्यांसाठी हे प्रमाण १२.४ टक्के होते तर आफ्रिकेत ते ३४.७ टक्के होते.

## २.२ तंत्रज्ञान आणि कामगार उत्पन्नाचा वाटा :

तंत्रज्ञानात होणारी प्रगती आर्थिक वृद्धीसाठी खूप महत्त्वाची मानली जाते (अघियन आणि हॉविट १९९०, रोमर १९९४). परंतु अनुभवजन्य अभ्यास, असे दर्शवितात की तांत्रिक प्रगतीमुळे अल्पकालावधीत क्षणिक व्यत्यय निर्माण होऊ शकतात. काही विशिष्ट परिस्थितीत रोजगार आणि कामाचे तास त्यामुळे कमी होऊ शकतात. अलीकडील अभ्यासातून दिसून आले आहे की कामगार उत्पन्नाच्या वाट्यामध्ये

दीर्घकालीन घट होण्यामागे ऑटोमेशनसारखे तांत्रिक घटक जबाबदार आहेत (बर्गहोल्ट आणि इतर २०२२). असेमोग्लू आणि रेस्ट्रेपो (२०१८) यांच्या मांडणीनुसार ऑटोमेशनसारख्या नवोपक्रमांमुळे कामगार उत्पन्नाचा वाटा कमी होऊ शकतो, तर श्रम-घन तंत्र निर्माण केल्याने तो वाढतो. दुसरीकडे, काही नवोपक्रमांचा अस्पष्ट परिणाम देखील होऊ शकतो.

जागतिक रोजगार आणि सामाजिक दृष्टिकोन- २०२४ च्या अहवालात २००३ ते २०१९ पर्यंत ३६ प्रगत देशांसाठी तांत्रिक नवोपक्रम (technological innovations) आणि कामगार उत्पन्न वाटा यांच्यातील संबंधांचे विश्लेषण केले आहे. तंत्रज्ञानातील नवोपक्रमांमुळे कामगार उत्पादकता लक्षणीयरीत्या (२.१ टक्के, नवोपक्रमाच्या वर्षात) वाढल्याचे आढळून आले आहे. या वाढीमुळे प्रभावी वर्षात जीडीपीत (स्थूल देशांतर्गत उत्पादन) १.४ टक्क्यांची वाढ होते. या बाबतीत जीडीपीतील वाढ कामगार उत्पादकतेपेक्षा कमी प्रमाणात होत असल्याने कामाचे तासही कमी होतात (०.७ टक्के). यामुळे रोजगारात घट होते. या परिणामांचे स्वरूप अस्थायी आहे हे मात्र नमूद करायला हवं.

परंतु, तांत्रिक नवोपक्रमांमुळे (असमायोजित/unadjusted) कामगार उत्पन्नाच्या वाट्यामध्ये प्रभावी वर्षात ०.३ टक्क्यांनी घट होताना दिसते. एकीकडे जीडीपी वाढल्याने परंतु त्याचवेळी कामगार उत्पन्न दरात घट झाल्याने, कर्मचाऱ्यांच्या निव्वळ भरपाईत नवोपक्रमानंतर चार वर्षांनी सरासरी ०.६ टक्क्यांनी वाढ होते. इथे हे समजणे गरजेचे आहे की, जीडीपी वाढीच्या टक्केवारीपेक्षा ही वाढ खूपच कमी आहे. अशा प्रकारे, तांत्रिक प्रगती करूनही भौतिक कल्याणाची हमी देता येणे कठीण बाब आहे. आपण असे गृहीत धरले की येणाऱ्या काळात एआयमुळे अशा पद्धतीचे परिणाम होऊ शकतील, तर कामगार उत्पन्नाच्या दरावर याचा मोठा परिणाम होऊ शकतो. यामुळे असमानता वाढू नये याची काळजी घेण्याकरिता योग्य सार्वजनिक धोरणात्मक उपाययोजना महत्त्वपूर्ण ठरतील.

## ३. रोजगार, शिक्षण किंवा प्रशिक्षणात नसलेल्या तरुणांचे प्रमाण :

रोजगार, शिक्षण किंवा प्रशिक्षणात नसलेल्या तरुणांचे प्रमाण कमी करणे हे धोरणकर्त्यांसमोरील एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. एआयच्या उदयासह आणि विशेषतः चॅटजीपीटी सारख्या साधनांमुळे, तरुणांना शिक्षण आणि मूलभूत कौशल्ये अवगत असणे गरजेचे झाले आहे. साल २०१५ मध्ये रोजगार, शिक्षण किंवा प्रशिक्षणात नसलेल्या तरुणांची जागतिक आपता (global incidence) २१.३ टक्के होती. २०२४ च्या आयएलओच्या अंदाजानुसार, २०.४ टक्के इतकीच माफक सुधारणा झाली आहे. अशाप्रकारे, २०१४ ते २०२४ दरम्यान तरुणांची लोकसंख्या जरी वाढली असली तरी, रोजगार, शिक्षण किंवा प्रशिक्षणात नसलेल्या तरुणांची एकूण केवल (absolute) संख्या तितकीच राहिली आहे.

रोजगार, शिक्षण आणि प्रशिक्षणात नसलेल्या तरुणांची आपता अरब देशांमध्ये (३३.३ टक्के) आणि आफ्रिकेत (२३.३ टक्के) सर्वाधिक आहे. आशिया आणि पॅसिफिक, लॅटिन अमेरिका आणि कॅरिबियनमध्ये हे प्रमाण अनुक्रमे २०.४ टक्के आणि १९.७ टक्के आहे. युरोप आणि मध्य आशिया (१३.० टक्के) तसेच उत्तर अमेरिकेत (११.३ टक्के) हे प्रमाण मात्र सर्वात कमी आहे. शिक्षण आणि रोजगाराच्या उपलब्धतेमध्ये देखील लिंगभाव असमानता

आढळून येते. २०२४ मध्ये, जागतिक स्तरावर तरुण महिला रोजगार, शिक्षण आणि प्रशिक्षणात नसल्याची आपता २८.२ टक्के होती. तरुण पुरुषांच्याबाबतीत, मात्र ही १३.१ टक्के होती. याच कालावधीत या घटकांच्या रोजगार दरांमध्ये १३ टक्क्यांचा फरक होता. सकल नोंदणी दरात तुल्यता (parity) असल्याने, हा फरक प्रामुख्याने रोजगारातील तफावतींमुळे होऊ शकतो. रोजगारातील तफावत कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे निर्माण होऊ शकते असे सदर अहवाल नमूद करतो. या संबंधित लिंगभेद अरब राज्यांमध्ये सर्वाधिक आढळतात. युरोप आणि मध्य आशिया तसेच उत्तर अमेरिकेत हे प्रमाण सर्वात कमी आहे. लिंगभेद आणि प्रदेशनिहाय असमानता कमी करण्यासाठी शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे महत्त्वाचे असल्याचे लक्षात घेतले पाहिजे.

## ४. निष्कर्ष :

जागतिक रोजगार आणि सामाजिक दृष्टिकोन अहवालाच्या २०२४ च्या अपडेटमध्ये कामगार उत्पन्नाचा वाटा आणि रोजगार, शिक्षण आणि प्रशिक्षणात नसलेल्या तरुणांशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली आहे. प्रथमतः, गेल्या दोन दशकांत कामगारांना मिळालेल्या उत्पन्नाचे प्रमाण कमी झाले आहे, असे अहवाल सांगतो. टक्केवारीच्या बाबतीत ही घट जरी माफक वाटत असली, तरी कामगार उत्पन्नात मोठी घट झाल्याचे समजते. तांत्रिक नवोपक्रमांमुळे जीडीपी आणि कामगार उत्पादकता जरी वाढत असली, तरिही यामुळे कामगार उत्पन्नाचा वाटा कमी होतो असे दिसून येते. अलीकडच्या काळात एआयची वाढलेली भूमिका लक्षात घेता, असमानतेतील संभाव्य वाढीला तोंड देण्यासाठी योग्य धोरणात्मक हस्तक्षेप आवश्यक आहेत.

तसेच, रोजगार, शिक्षण आणि प्रशिक्षणात तरुणांचा सहभाग सुधारण्याची गरज या अहवालात अधोरेखित करण्यात आली आहे. दीर्घकालीन आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी शिक्षण आणि रोजगाराच्या संधी महत्त्वाच्या असून, त्या दिशेने ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. हे जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत शाश्वत विकास उद्दिष्टांची पुर्तता करण्याचा वेग मर्यादित राहील.

## संदर्भ :


1. Acemoglu, D. and P. Restrepo. "The Race between Man and Machine : Implications of Technology for Growth, Factor Shares and Employment." American Economic Review, Vol. 108, No. 6, pp. 14881542.

2. Aghion, P. and P. Howitt (1992). "A Model of Growth through Creative Destruction." Econometrica, Vol. 60, No. 2, pp. 323-351.

3. Drago Bergholt D., F. Furlanetto and Nn Maffei-Faccioli (2022). "The Decline of the Labor Share : New Empirical Evidence." American Economic Journal, Vol. 14, No. 3, pp. 163-198.

4. International Labour Organisation (2024). "World Economic and Social Outlook: September 2024 Update. International Labour Organisation.

5. Romer, Paul. M (1994). "The Origins of Endogenous Growth." Journal of Economic Perspectives, Vol. 8, No. 1, pp. 2-22.


इमेल - pooja.thakur@gipe.ac.in